# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२
### (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरुवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (४)] —**

(१) **श्री.जयंत पाटील, वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यात विविध प्रकल्पात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी काढलेला मोर्चा, बल्क ड्रग्ज फार्मा पार्क, जे एस डब्ल्यू या खाजगी कंपनीसाठी शासनाने चालवलेले सक्तीचे संपादन, विरार, अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर या महाकाय व खर्चिक तसेच अनावश्यक प्रकल्पासाठी चाललेले तातडीचे संपादन, त्यासाठी संसदेने २०१३ मध्ये पारित केलेला भूमी संपादन कायदा गुंडाळून सरकारने चालवलेला अन्याय सदर प्रकल्पांना शेतकऱ्यांचा असलेला विरोध, ते रद्द करण्याची मागणी, जिल्ह्यातील वाढते प्रदूषण, भाताखालील क्षेत्र गेल्या वीस वर्षात व सध्याच्या संपादनामुळे दीड लाख एकरने घटणे, त्यामुळे उपजीविका, रोजगार व पर्यावरण यावर होणारा परिणाम, शेतकऱ्यांची सतत होणारी फसवणूक, उद्योगांसाठी यापूर्वी संपादित केलेल्या जमिनी न वापरता पडून रहाणे, त्यामुळे होणारे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, इको सेन्सिटिव्ह झोन व अभयारण्यालगतचे क्षेत्र संपादित केले जाणे, त्याचे पर्यावरणावरील परिणाम, वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यावर वारंवार ओढवणाऱ्या अतिवृष्टी व पूर, दरडी कोसळणे इ. आपत्ती, त्यामुळे होणारी हानी यामुळे जिल्ह्यात वाढत असलेला असंतोष व यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-गोवा महामार्गाचे काम सन २०११ मध्ये सुरू झाले असून दोन वेळा कंत्राटदार बदलूनही मोठ्या प्रमाणात काम अद्याप अपूर्ण असणे, अनेक ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत असणे, त्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना

अग्रिम प्रत

धुळीचा व खड्ड्यांचा सामना करावा लागत असून पावसाळ्यात या संपूर्ण भागात चिखलाचे साम्राज्य पसरत असल्यामुळे अपघाताचे प्रमाणही वाढलेले असणे, मागील दशकापासून मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू असूनही ते पूर्ण न झाल्यामुळे कोकणचा विकास रखडला असणे, महामार्गाच्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांमुळे पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्या नादुरुस्त झाल्या असून लगतच्या गावांमध्ये पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण झाली असणे, कंत्राटदाराकडून नादुरुस्त पाणी पुरवठा वाहिन्या दुरुस्त करुन घेण्याबाबत शासनाकडून कोणताही पुढाकार घेतला जात नसणे, महामार्गाचे काम तातडीने पूर्ण होण्याची तसेच नादुरुस्त पाणी पुरवठा वाहिन्या दुरुस्त करुन दिल्याशिवाय कंत्राटदारांना देयक अदा न करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोकणवासियांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, रविंद्र फाटक, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) पायरवाडीतील पहिलीत शिकणाऱ्या कु. अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा जव्हार कुटीर रुग्णालयात दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू, सदर बालकास त्याच्या कुटुंबियांनी दि. २४ जानेवारी, २०२२ रोजी उपचारासाठी त्र्यंबकेश्वर येथील दवाखान्यात नेणे, तेथे एक दिवसाच्या उपचारानंतर त्याला सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा त्र्यंबकेश्वर येथील डॉक्टरांनी दिलेला सल्ला, तदनुसार मुलाच्या पालकांनी त्याला मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनीही बालकाला जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल करण्यास सांगणे, पालकांनी जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्या बालकावर उपचार मिळण्यास विलंब झाल्यामुळे दि.२५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू, मृत बालकाचा मृतदेह घरी नेण्यासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने त्यांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्यास जव्हार येथील कुटीर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून झालेला हलगर्जीपणा, मृतदेह रुग्णवाहीकेतून नेण्यासाठी पैसे न दिल्यास रुग्णवाहीका मिळणार नाही, असे रुग्णवाहीकेच्या चालकाने मृत बालकाच्या वडिलांना सांगणे, परिणामी मुलाचा मृतदेह ३५ ते ४० किमी अंतरावर असलेल्या स्वतःच्या घरी दुचाकीवरुन नेण्यात येणे, या दुर्देवी घटनेला जबाबदार असलेल्या रुग्णालयाच्या प्रशासनाच्या कारभाराविषयी जनमानसात वाढता तीव्र असंतोष, शासनाने या दुर्देवी घटनेची व प्रशासनाच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन

अग्रिम प्रत

जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मराठवाडा विभागात जिल्हा परिषदेच्या १२ हजार ६४५ शाळा असणे, त्यातील ५ हजार २७९ शाळेची वीज देयके थकीत असणे, म्हणजे ४१.७४ टक्के शाळांकडे वीज थकबाकी असणे, दर महिन्याला पाचशे ते सातशे रुपये वीज बिल येत असून सदर रक्कम सादिल अनुदानातून भरणे अपेक्षित असणे, परंतू सन २०१२-२०१३ पासून शासनाने शाळांना सादिल अनुदान दिले नसणे, कोरोनामुळे बंद असलेल्या शाळा सुरु झाल्यानंतर वीज मंडळाकडून शाळांमधील वीज कनेक्शन कापण्याचा सपाटा लावला असून मराठवाडयातील १ हजार २४३ शाळांची वीज कट करण्यात आली असणे, त्यामुळे शाळेतील संगणक, उपकरण बंद पडली असणे, शासनाकडून सादिल रक्कम वेळेवर मिळत नसल्याने थकीत वीज बिलाची रक्कम कोणी व कधी भरावयाची असा पेच मुख्याध्यापकांना पडला असणे, एका बाजूला ऑनलाईन शिक्षण दिले जात असल्याचा दावा केला जात असताना व शाळांच्या संगणकीकरणावर कोट्यवधींचा खर्च होत असताना शाळेत वीज नसल्याने शिक्षकांना नवीन समस्यांना सामोरे जावे लागत असणे, ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मराठवाडयातील सर्वच शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याची गरज असणे, ५ हजार २७९ शाळांची थकीत वीजबिल तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यासाठी होत असलेली मागणी, त्यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री विक्रम काळे,** शशिकांत शिंदे अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, अब्दुल्लाखान दुर्राणी, अनिकेत तटकरे, संजय दौंड, अरुण लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात दुष्काळी भागात पाणी वळविणे हे नदी जोड प्रकल्पाचे मुख्य तत्व असल्याचे मानले जाणे, त्यासाठी दुष्काळी भाग एकाच राज्यातील राज्यांतर्गत असो किंवा दोन राज्यातील असो तथापि, या तत्वाला केंद्र शासनाने तिलांजली देऊन फक्त दोन किंवा जास्त राज्यातील पाणी वळविण्यात येणार असेल तर, नदी जोड प्रकल्पांना केंद्र शासनाकडून निधी दिला जाईल अशी भूमिका केंद्र शासनाने घेतली असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, त्यानुसार पार-तापी-नर्मदा या नदीजोड प्रकल्पाला केंद्र शासनाने निधी देण्याची तयारी दर्शविणे, परंतु पार-

अप्रकाशित प्रत

तापी-नर्मदा लिंक प्रकल्पात महाराष्ट्र राज्याच्या नार-पार खोऱ्यातील १५ टीएमसी पाणी गुजरातमध्ये १२०० कि.मी.अंतरावर उत्तरेकडे वळविण्यात येणार असल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाराष्ट्र राज्याच्या याच पाण्यावर गुजरात मध्ये मुंबईच्या धर्तीवर धोलेरा नावांचे आंतरराष्ट्रीय शहर उभारुन त्याचा आकार परदेशातील शांघाय शहराच्या पाचपट आणि दिल्लीच्या दुप्पट करण्याची भूमिका तसेच देशभरातील संपूर्ण उदयोग व व्यापार याच भागात केंद्रीत करण्याचा मानस असल्याचे निदर्शनास येणे, त्यासाठी हातभार लावण्यास कोणाचाही विरोध नसणे, परंतु महाराष्ट्राने पार-तापी-नर्मदा लिंक प्रकल्पासाठी पाण्याचा हक्क अन्य राज्याला दिल्यास गिरणा खोऱ्यातील कळवण,सटाणा, देवळा, मालेगाव, नांदगाव, चांदवड, येवला आणि जळगाव जिल्हा कायमस्वरुपी दुष्काळी राहण्याची शक्यता असणे, महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी अन्य राज्याला देणार का, असा निर्माण झालेला प्रश्न त्यामुळे राज्याच्या हक्काचे पाणी अन्य राज्याला देण्याबाबत विरोध करावा अशी सर्वत्र होत असलेली मागणी, त्यामुळे राज्याच्या हिताचा निर्णय घेण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

(६) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यावर्षी मराठवाडयातील शेतकऱ्यांकडे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असतानाही केवळ वीजेअभावी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देता येत नसल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये उघडकीस येणे, मागील आठ दिवसापासून भोकरदन येथील २२० केव्हीचे रोहित्र जळाल्याने तालुक्यातील सात विद्युत उपकेंद्रावरील शेतातील ४०० विद्युत रोहित्रावरील वीज पुरवठा विस्कळीत होणे, परिणामी शेतकरी प्रचंड त्रस्त होणे, आधीच अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कापूस, मका आदि पिके नष्ट झाल्याने शेतकरी मेटाकुटीस आलेला असताना आता रब्बी हंगामातील पिकांना वीजेअभावी पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर ओढावलेले आर्थिक संकट, रब्बी हंगामातील पिके अंतिम टप्प्यात असल्याने पिकांना पाण्याची आवश्यकता असताना पाणी मिळत नसल्याने पिकांचे होत असलेले नुकसान, वीज पुरवठा सुरळीत करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

(७) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई येथील अंधेरी (पूर्व) येथे MIDC च्या हद्दीत झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये

अप्रकाशित प्रत

आकृती निर्माण (Hub Town) कंपनीचे विकासक यांनी स्थानिक रहिवाशांच्या खोल्या ताब्यात घेऊन परस्पर बाह्य लोकांना करोडो रूपयामध्ये विकून टाकणे, या मध्ये ३५० कोटी रुपयांच्या व्यवहाराची शक्यता असणे, तसेच कम्युनिटी सेंटरच्या जागेवर Three Star दर्जाचे बेकायदेशीर हॉटेल बांधण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी२०२२ च्या दरम्यान उघडकीस येणे, विकासक व त्यांचे एजंट यांच्या विरोधात दि. १३.०२.२०२० रोजी क्र. ७५ / २० हा FIR दाखल करण्यात आलेला असणे, सदर ठिकाणी लाखो स्क्वेअर फुटाचे बेकायदेशीर बांधकाम करण्यात आलेले असणे आणि MIDC आणि आकृती निर्माण (Hub Town) यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यानुसार या झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये शेकडो कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असणे, तसेच बांधकामामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता केल्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, शासनाने याबाबत सखोल चौकशी करुन बेकायदेशीर बांधकाम पाडण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही तसेच संपूर्ण घोटाळयाची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात नुकत्याच अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेर, कळमेश्वर, रामटेक, पारशिवनी आदी तालुक्यात सुमारे ६ हजार ४५ हेक्टर क्षेत्रावरील शेतपिके व फळबागाचे नुकसान झालेले असुन त्यामध्ये ८१७९ शेतकऱ्यांचा समावेश असणे, संपूर्ण नुकसानभरपाईपोटी शासनाकडे ५ कोटी ६६ लक्ष रुपये इतक्या निधीची मागणी करण्यांत आलेली असणे, सोबतच वर्धा जिल्ह्यातील ८ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याने जवळपास ३ कोटी ७७ लक्ष रूपयांची मागणी केलेली असणे, सोबतच रस्ते व पुलांच्या दुरूस्तीबद्दल झालेल्या बैठकीत निर्देश दिलेले असणे, मात्र अद्यापही शासनाने मदतीबाबत कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, नागपूर जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती संदर्भातील ३ लक्ष ४९ हजार ५८२ शेतकऱ्यांचे २ लक्ष ८४ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झालेले असणे त्यात २२६ कोटी ६३ लक्ष रूपये नुकसान भरपाईचा समावेश असणे, हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, शासन या संदर्भातील प्रस्तावाला मंजुरी प्रदान करणार की नाही असा संभ्रम निर्माण होत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानीपोटी आत्महत्यांशिवाय पर्याय उपलब्ध नसणे, बैठक घेऊन ही प्रश्न निकाली निघत नसणे, याबाबत ठोस कार्यवाहीची आवश्यकता असणे, त्यामुळे मागील व नवीन नुकसान भरपाई प्रस्तावाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(दुपारी १२-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** : "डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला व शेवटचा दिवस).**

**सहा : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा — (पहिला दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१. उप मुख्यमंत्री.

२. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

४. गृहमंत्री.

५. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

६. अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री.

अमुद्रित प्रत

७. ग्रामविकास, कामगार मंत्री

८. शालेय शिक्षण मंत्री.

९. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

१०. सहकार, पणन मंत्री

११. परिवहन, संसदीय कार्य मंत्री.

१२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

**सात : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ५ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२२"

(२) "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर जिल्हयात प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेन्वये १३ तालुक्यातील लाभार्थ्यांकरीता रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत दुग्धविकास व शेळीपालन गट वाटप योजनेस जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत मान्यता प्राप्त केलेली असणे, सदर योजनेंतर्गत रुपये १०.४५ कोटी निधी देण्यात आलेला असणे, जिल्ह्यातील सर्व तालुक्याला समान तत्वावर योजनेचा लाभ न देता आर्थिकदृष्टया प्रबळ व्यक्तीची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येणे, त्यामुळे गरजू व्यक्तींची नावे यादी मध्ये समाविष्ट करण्यात आलेली नसणे, प्रत्येक तालुक्यासाठी समान वाटपाचे धोरणान्वये लाभार्थी निवडण्याबाबत तसेच नव्याने यादी तयार करण्याबाबत जिल्हा परिषद सदस्यांची मागणी केलेली असणे, रोजगार निर्मितीचा लाभ गरजू लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

अस्वाक्षरित प्रत

"राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने डेंग्यूच्या तपासणीसाठी सहाशे रुपये व स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीसाठी साडेतीन ते पाच हजार रुपयांची दर मर्यादा निश्चित केली असणे, विशेषत: मुंबईमध्ये साथीच्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांकडून तातडीने रक्त तपासणीचा अहवाल मिळण्याकरिता तसेच घरी रक्त तपासून देण्याच्या सुविधेकरिता खाजगी पॅथॉलॉजी लॅब अतिरिक्त देयके आकारत असणे, डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्ल्यू, एचबी व कोरोना यासारख्या तपासण्या रुग्णांना गरज नसतानाही पॅथॉलॉजी लॅबकडून करण्यात येत असणे, खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून होत असलेली रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाने या तपासण्यांसाठी प्रत्येकी रुपये ६०० पेक्षा जास्त शुल्क न आकारण्याच्या दिलेल्या निर्देशाचे पालन न करणे, डेंग्यूची तपासणी वगळता अन्य कोणत्याही वैद्यकीय तपासणीवर शासनाचे नियंत्रण नसणे याबाबत राज्यात अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ५ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत